नि.फौ.क्र. ३६५/२०२०
शासन वि. मल्हारी व इतर
नि.क्र. २२

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ शपथेवरः-</u>**

माझे नाव : दत्तु रामराव घोडके,
वय ५१ वर्षे, कामधंदा - शेती,
रा. वानवडा, ता. औसा, जि. लातुर.

**<u>सरतपास सरकारतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती. एम.एस.रेचवाडे यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

माझी गट क्र. १८० मध्ये जमीन आहे. दि. २९.०९.२०२० रोजी आम्ही सोयाबीन काढले व दुस-या दिवशी आम्ही सोयाबीनची गंजी झाकुन संध्याकाळी घरी आलो होतो. दि. ३०.०९.२०२० रोजी रात्री ८.३० वाजता घटना घडली. पद्माकरचा मला फोन आला की, तुमची गंजी जाळली आहे तुम्ही लवकर या. त्यानंतर मी व संजय काळे, दशरथ घोडके, सचिन घोडके तेथे गेलो व पाहिले असता गंजी जळाली होती. त्यामध्ये आमचे ९२,०००/- रूपयाचे नुकसान झाले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात जाउन तक्रार दिली. दोन्ही आरोपी आमच्या गावातील आहे. त्यांना मी ओळखतो. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावरील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. २३** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. कदम यांचेमार्फत शपथेवर सरु -</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटना प्रत्यक्ष माझया समक्ष घडली नाही व मी सांगतो ती गंजी आरोपींनी माझे डोळ्यासमक्ष जाळली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे जमिनीचे अतिक्रमणाबाबत वाद आहे. हे

म्हणणे खरे नाही की, माझे फिर्यादी मधील सर्व मजकुर खोटा आहे व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला...</u>**

**<u>फेरतपास नाही...</u>**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

स्वाक्षरी/-
(नितेश बी. राठोड)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १३.०३.२०२५

माझे समक्ष,

स्वाक्षरी/-
(नितेश बी. राठोड)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि.१३.०३.२०२५